जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 AUG 2021
पुण्यनगरी

# मा.ना.- द डॉक्युमेंट्री माहितीपटाची निवड

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठतील मास कम्युनिकेशनचा विद्यार्थी सोमदत्त देसाई याच्या 'मा.ना.- द डॉक्युमेंट्री' या माहितीपटाची निवड 'स्वतंत्रता विज्ञान फिल्म फेस्टिव्हल'साठी झाली. गडहिंग्लज तालुक्यातील दुंडगे गावचे गांधीवादी स्वातंत्र्यसैनिक माधव कुलकर्णी यांच्या जीवनावर हा माहितीपट आधारित आहे. केंद्रीय विज्ञान तंत्रज्ञान मंत्रालय विज्ञान प्रसार विभाग, फिल्म्स डिव्हिजन, विज्ञान भारती व माहिती प्रसारण मंत्रालय भारत सरकार यांच्या वतीने हा फिल्म फेस्टिव्हल १३ ते १५ ऑगस्ट दरम्यान आयोजित केलेला आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 AUG 2021
तरुण भारत

# राष्ट्रगीत सादर करुन व्हिडिओ अपलोड करा

कोल्हापूर : भारतीय स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्धापण दिनानिमित्त देशभर 'आजादी का अमृत महोत्सव" सुरू होत आहे. त्यामुळे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचनेनुसार शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थ्यांनी भारताचे राष्ट्रगीत वैयक्तिक सादर करून व्हिडीओ **https://rashtragaan.in** या संकेत स्थळावर अपलोड करावा. अपलोड केलेला व्हिडीओ आज (दि. १५) रोजी दिवसभर प्रसारीत केला जाणार आहे, तरी या सूचनेचे पालन करावे, असे परिपत्रक महाविद्याय, अधिविभागांना विद्यापीठ प्रशासनाने पाठवले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 AUG 2021

तरुण भारत

# आर्थिक धोरणावर विद्यापीठात उद्या व्याख्यानमाला

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागाच्यावतीने सोमवारी दुपारी ३ वाजता 'आर्थिक धोरणे आणि सद्यस्थिती' या विषयावरील व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. या व्याख्यानमालेचे उद्घाटन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते होईल. या व्याख्यानमालेत ज्येष्ठ वैज्ञानिक डॉ. रघुनाथ माशेलकर, माजी केंद्रीय मंत्री व जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. वाय. के. अलघ, रिझर्व्ह बँकेच्या माजी डेप्युटी गव्हर्नर उषा थोरात, गोखले इन्स्टिट्यूटचे संचालक प्रा. राजस परचुरे, नाबार्डचे माजी अध्यक्ष डॉ. यशवंत थोरात, आदी मार्गदर्शन करणार आहेत.